मुद्रा कर्जे थकली

वसुली न झालेल्या कर्जांचा आकडा १७,२५१ कोटी रुपयांवर

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या मुद्रा योजनेतील कर्जे थकल्याचे स्पष्ट झाले आहे. या योजनेंतर्गत वितरित केलेल्या एकूण कर्जांपैकी सुमारे तीन टक्के कर्जे थकली आहेत, अशी माहिती सरकारतर्फे मंगळवारी राज्यसभेत देण्यात आली. राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान झालेल्या चर्चेत या योजनेच्या सद्यस्थितीविषयी सदस्यांनी लेखी प्रश्न विचारले. यावर उत्तर देताना केंद्रीय अर्थराज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी ही माहिती दिली. या योजनेतील थकीत कर्जांचा आकडा १७,२५१ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी ८ एप्रिल २०१५मध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे लोकार्पण केले होते. या योजनेला प्रथमपासून चांगला प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत त्या अंतर्गत एकूण ६.०४ लाख कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. मात्र यातील काही कर्जदार हप्ते फेडण्यात टाळाटाळ करत असल्याचेही दिसून आले होते. ठाकूर यांनी मंगळवारी राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार यातील तीन टक्के कर्जे थकीत असल्याचे स्पष्ट झाले.

ते म्हणाले की, 'अनुसूचित व्यापारी बँका व विभागीय ग्रामीण बँकांनी दिलेल्या माहितीनुसार मुद्रा योजनेंतर्गत एकूण ६.०४ लाख कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले असून त्यातील १७,२५१ कोटी रुपयांची कर्जे अनुत्पादित मालमत्ता (थकीत कर्ज) ठरली आहेत. एकूण कर्जवाटपाचा विचार केला असता थकीत कर्जांचे प्रमाण २.८६ टक्के आहे.'

कर्जे कोणाला?

मुद्रा योजनेंतर्गत कोणत्याही तारणाशिवाय १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जाते. मात्र ही कर्जे केवळ बिगर व्यावसायिक, बिगर कृषी, बिगर लघु व सूक्ष्म व्यावसायिक घटकांना दिली जातात. कोणताही आधार नसलेल्या असंघटित व उद्यमशील व्यक्तींना पतसाह्य करण्याच्या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली. यामध्ये शिशु, किशोर व तरुण या तीन श्रेणींनुसार कर्जमर्यादा बदलते. या योजनेमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागल्याचे आधीच स्पष्ट झाले आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिला व्यावसायिकांची संख्याही लक्षणीय आहे.

२.३ लाख कोटींच्या मालमत्ता जप्त

सरकारी बँकांची कर्जे थकवणाऱ्या कर्जदारांकडून वसुली करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे गेल्या तीन आर्थिक वर्षांत एकूण २.३ लाख कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत, अशी माहिती ठाकूर यांनी लोकसभेत दिली. थकीत कर्जदारांच्या १.७ लाख मालमत्तांवर कारवाई करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मार्च २०१९ अखेरीस सरकारी बँकांच्या एकूण थकीत कर्जांचा आकडा ९.४ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

पतधोरण समितीच्या बैठकीस सुरुवात

मुंबई : रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीस मंगळवारपासून मुंबईत सुरुवात झाली. बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या तीनदिवसीय बैठकीच्या अंती, गुरुवारी डिसेंबर व जानेवारी या महिन्यांसाठीचे पतधोरण घोषित करण्यात येईल. रिझर्व्ह बँकेने सलग पाचवेळा रेपो दरात कपात केली असून या दरात एकूण १.३५ टक्क्यांची घट होऊन तो सध्या ५.१५ टक्क्यांवर आहे.

एचडीएफसी बँकेच्या ग्राहकांना मनस्ताप

मुंबई : खासगी क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या एचडीएफसी बँकेच्या ग्राहकांना सोमवारी प्रचंड मनस्तापास सामोरे जावे लागले. या बँकेची नेटबँकिंग सेवा तसेच, मोबाइल अॅपमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने डिजिटल व्यवहार रखडले. महिन्याची सुरुवात असल्याने या बँकेच्या ग्राहकांकडून केल्या जाणाऱ्या पूर्वनिश्चित व्यवहारांना मोठा फटका बसला. मंगळवारी दुपारनंतर या सुविधा बऱ्याच अंशी पूर्वपदावर आल्या.

एचडीएफसी बँकेने काही वर्षांपासून आपल्या कार्यप्रणालीत आधुनिक तांत्रिक बदल केल्याने या बँकेचे ग्राहक प्रामुख्याने डिजिटल व्यवहारांवरच अवलंबून आहेत. या बँकेनेच दिलेल्या माहितीनुसार बँकेच्या एकूण व्यवहारांपैकी तब्बल ९२ टक्के व्यवहार हे इंटरनेट व मोबाइल अॅपमार्फत होतात. तर प्रत्यक्ष शाखा, एटीएम व फोन बँकिंगद्वारे होणाऱ्या व्यवहारांचे प्रमाण अनुक्रमे चार, तीन व एक टक्का आहे. सोमवारी बँकेच्या तांत्रिक प्रणालीत मोठी समस्या निर्माण झाल्याने खातेदार व ग्राहकांचे डिजिटल व्यवहार ठप्प झाले. मोबाइल अॅपवरून व्यवहार पूर्ण करण्यात अडचण येत असल्याने ग्राहकांनी नेटबँकिंगचा पर्याय चाचपून पाहिला. मात्र तेथेही त्यांना असाच अनुभव आला.

'लोकमान्य'तर्फे बिल पेमेंट सेवा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

लोकमान्य मल्टिपर्पज को ऑप. सोसायटीने 'भारत बिल पेमेंट सेवा' सुरू करण्यात आली आहे. 'टीजेएसबी'च्या सहकार्याने ही सेवा संस्थेच्या पुणे, मुंबई, गोवा येथील कार्यरत सर्व शाखांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. याद्वारे वीजबिल, गॅसबिल, पाणीदेयक, मोबाईल, डीटीएच अशी सर्व बिले स्वीकारली जातात, यामुळे सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध प्रकारची बिले त्यांना संस्थेत सहजरित्या भरता येतील, अशी माहिती संकल्पनेचे संयोजक लोकमान्यच्या पुणे विभागाचे विभागीय व्यवस्थापक सुशील जाधव यांनी दिली.

नकोशा कॉलच्या प्रमाणात वाढ

नवी दिल्ली : आपली उत्पादने, कर्जे, विविध ऑफर याची विक्री करण्यासाठी विविध कंपन्यांकडून फोन कॉल व लघुसंदेश प्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. मोबाइल यूजरच्या संमती व इच्छेशिवाय केल्या जाणाऱ्या या कॉलच्या संख्येत दिवसेंदिवस भरच पडत असून चालू वर्षात हे प्रमाण १५ टक्क्यांनी वाढले असल्याचे स्पष्ट झाले आहे. मोबाइल वापरणाऱ्या प्रत्येक भारतीयाला दरमहा सरासरी २५.६ अनावश्यक कॉल स्वीकारावे लागत असल्याचे दिसून आले आहे.

नकोसे कॉल स्वीकाराव्या लागणाऱ्या देशांच्या सूचीत भारत गेल्या वर्षी दुसऱ्या क्रमांकावर होता. यंदा भारताचे स्थान पाचव्या क्रमांकापर्यंत घसरले असले तरी अशा कॉलच्या संख्येत मात्र १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे, असे ट्रूकॉलरच्या अहवालात म्हटले आहे. या सूचीमध्ये ब्राझील पहिल्या स्थानी आहे. यानंतर पेरू, इंडोनेशिया आणि मेक्सिको या देशांचा क्रमांक लागतो.

वित्तीय सेवांचा तगादा

वित्तीय सेवा पुरवणाऱ्या संस्थांकडून केल्या जाणाऱ्या कॉल व मेसेजमध्ये गेल्या वर्षभरात कमालीची वाढ झाली आहे. नकोशा कॉलच्या वर्गवारीत गेल्या वर्षी वित्तीय सेवांची वेगळी वर्गवारी करण्यात आली नव्हती. चालू वर्षी मात्र नकोशा कॉलमध्ये या प्रकारच्या कॉलचे प्रमाण १० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे ट्रूकॉलरच्या अहवालात म्हटले आहे.

व्यापारयुद्धाच्या धास्तीने निर्देशांकांत घसरण

मुंबई : अमेरिकेने व्यापारयुद्धासाठी नव्या देशांची 'निवड' केल्याचा फटका मंगळवारी आशियातील शेअर बाजारांना बसला. गेले काही दिवस नवनव्या स्तरास स्पर्श करणाऱ्या मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात मंगळवारी १२६ अंकांची घसरण झाली व तो ४०६७५वर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक ५४ अंकांच्या घसरणीसह ११९९४वर बंद झाला.

अमेरिका व चीनमधील व्यापारयुद्धातून तोडगा निघण्याचे संकेत मिळाल्याने बाजारात गेले काही दिवस उत्साहाचे वातावरण होते. मात्र अमेरिकेने आता ब्राझिल व अर्जेंटिनाच्या दिशेने मोर्चा वळवला असून या दोन देशांतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त शुल्क आकारण्याचा निर्णय जाहीर केला. या घोषणेमुळे जगभरातील विशेषतः आशियाई बाजारांना धक्का बसला. अमेरिकेच्या या नव्या धोरणामुळे धातूसंबंधी कंपन्यांचे समभाग अडचणीत आले.

सोने	चांदी
३८२६५	४४५६०
सेन्सेक्स	**निफ्टी**
४०६७५	११९९४
डॉलर	**युरो**
७१.६६ ₹	७९.३९ ₹

महावितरण — वीज बंद निवेदन

दि. ०५/१२/२०१९ गुरुवार सकाळी १०.०० ते १६.०० वाजेपर्यंत सेंटमेरी उपविभागाअंतर्गत खालील परिसर वीज वाहिनीच्या देखभाल व दुरुस्ती कामासाठी बंद ठेवण्यांत येईल.

बाधित परीसर :- २२ के.व्ही. लुल्लानगर वाहिनी :- लुल्लानगर, सहाणी सुजान पार्क, रहेजा गार्डन, जी.एन.सॅटेलाईट, ऑस्कफोर्ड विलेज, मेस्ट्रो सोसायटी, ग्रीन व्हॅली, फ्लॉवर व्हॅली, सिक्रेट हार्ट टाउन, **२२ के.व्ही. फातिमानगर वाहिनी :-** फातिमानगर रोड, टायनी स्केअर, वानवडी, जांभूळकर मळा, वानवडी गाव, शिवरकर रोड, अयोध्या हॉस्पिटल, **२२ के.व्ही. नाईन हिल वाहिनी :-** क्लाउड ९, कैलास मानस, नाईन हिल, अॅक्रोपोलिस पर्पल डेव्हलपर्स, **२२ के.व्ही. बी.टी.कवडे रोड वाहिनी :-** बी.टी. कवडे रोड व परिसर इत्यादी वीज वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम झाल्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यांत येईल.

पी.आर.ओ. क्र. पीझेड/२५९/१९

कार्यकारी अभियंता, रास्तापेठ विभाग, पुणे

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, **अथर्व कन्सॉर्टीयम अॅण्ड रियालीटी प्रा. लि, तर्फे संचालक, श्री अंकुश विनयकुमार मेहता, श्री मनिष डी. मेहता आणि श्री आनंद बाबासाहेब जाधव** यांचे खरेदीमालकीहक्क व कब्जेवहिवाटीची आहे. तरी खालील परिशिष्ट मिळकती संबंधी, विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे मध्ये खरेदी व्यावहाराची बोलणी चालु असुन विद्यमान मालकांनी असा भरवसा दिला आहे की, परिशिष्ट मिळकत संबंधि विद्यमान मालक यानांच ताब्यासह मालकीहक्क, पणनयोग्य हक्क आहेत. तरी विद्यमान मालकांचे मालकीहक्क व पणनयोग्य हक्क तपासणेकामी, त्यांनी सांगितलेवरून, त्यांचेतर्फे सदरील जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली आहे.

खालील परिशिष्टात नमूद मिळकत पूर्णत: निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून, विद्यमान मालकांस, सदरील मिळकतीचे पूर्ण ताब्यासह मालकीहक्क, पणनयोग्य हक्क व अधिकार आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि, सदरील मिळकतीवर, विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यार, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, वगैरे असल्यांस, संबंधीतांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत, मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येवून खात्री करून द्यावी. सदरील मुदतीमध्ये हरकत न आल्यांस, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत पूर्णत: निर्वेध, निजोखमी व निष्कर्जी असून, विद्यमान मालकांस तिचे पूर्ण ताब्यासह मालकीहक्क, पणनयोग्य हक्क व अधिकार आहे, कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यांस, तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजण्यात येईल. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट

तुकडी –पुणे, पोट तुकडी तालुका – मुळशी, मे. दुय्यम निबंधक, हवेली, जिल्हा – पुणे, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालीका पिंपरी यांचे हद्दीतील, मुल्की गांव **मौजे – ताथवडे**, येथील मिळकत **सर्व्हे क्र. ६३/६** यांसी एकुण क्षेत्र ०१ हेक्टर ०६ आर पैकी **क्षेत्र ०० हेक्टर ५३ आर** ज्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे:–

पुर्वेस : लागुन रस्ता,
दक्षिणेस : लागुन भिमराव वाघमारे यांची मिळकत,
पश्चिमेस : लागुन नाना नवले यांची मिळकत,
उत्तरेस : लागुन देविदास सुदाम सोनावणे यांची मिळकत.

कळावे, ही नोटीस.
तारीख: ३/१२/२०१९.

अनुप के. इदगांवकर,
अॅड्व्होकेट, पत्ता: 'ए–२६', अक्षय पार्क, लक्ष्मण नगर, थेरगांव, पुणे ४११०३३; मोबाईल क्र. ८३०८८४३७८५;

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MUHS
१९वा दीक्षान्त समारंभ

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा १९वा दीक्षान्त समारंभ, **जानेवारी २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक** येथे आयोजित केला जाण्याचे प्रस्तावित आहे. यासंबंधी तपशीलवार **अधिसूचना क्रं. ४२/२०१९** विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (www.muhs.ac.in) उपलब्ध आहे.

नाशिक : ०४/१२/२०१९

कुलसचिव
(डॉ. के. डी. चव्हाण)

बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961
नोंदणीकृत कार्यालयः आकुर्डी, पुणे –४११०३५
कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे–अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे – ४११०१४

मुदत ठेव योजना

क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएए (स्टेबल)' रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

मासिक ठेव योजना (भारतीय रहिवासींसाठी)
₹५ कोटी प्रती ठेव पर्यंत वार्षिक व्याजदर (०७ डिसेंबर २०१९ पासून लागू) वैध आहे.

कालावधी महिन्यांमध्ये	संचयी		
	नवीन ग्राहकांसाठी	विशेष श्रेणी	
		जेष्ठ नागरिकांसाठी	बजाज समूहाच्या कर्मचाऱ्यांसाठी, बजाज फायनान्स लि. च्या ग्राहकांसाठी किंवा बजाज आलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. च्या विद्यमान पॉलिसी धारकांसाठी
१२ – २३	७.६०%	७.८५%	७.७०%
२४ – ३५	७.९०%	८.१५%	८.००%
३६ – ६०	८.१०%	८.३५%	८.२०%

[illegible]	31 मार्च 2019 रोजी	31 मार्च 2018 रोजी
[illegible]	1,340.49	1,243.80
[illegible]	245.19	-
[illegible]	5.45	3.11
[illegible]	0.32	8.90
[illegible]	0.24	32.98

[illegible]

नोकरी शोधताय? जॉब पाहताय? **पाहा** TIMES interact

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
पर्यावरण अभियांत्रिकी विभाग

जाहीर सुचना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, विविध बांधकाम संस्था खाजगी व शासकीय कामाचे ठेकेदार यांना या सुचनेव्दारे कळविणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम करताना व जुने बांधकाम पाडताना किंवा शासकीय संस्थांचे विकास कामे करताना निर्माण होणारा बांधकामाचा राडारोडा [Construction & Demolition Waste] इत्यादीची Construction & Demolition Waste Management Rule 2016 च्या अधिनियमानुसार विल्हेवाट लावणेची अंमलबजावणी करणेच्या धोरणास मा.महापालिका सभा ठराव क्र.४६९, दि.२०/११/२०१९ अन्वये मान्यता मिळाली असल्याने याची अंमलबजावणी सर्वांना बंधनकारक करणेत येत आहे. शहरात निर्माण होणारा बांधकाम राडारोडा नियमानुसार गोळा करुन वाहतुक करणेसाठी, तसेच सदरच्या राडारोड्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणेसाठी मनपाने मे.एस.एस.एन.एनोव्हेटीव्ह इन्फ्रा एल.एल.पी. [SSN Innovative Infra LLP] यांची नेमणूक केलेली आहे.

अशा प्रकारचा बांधकाम राडारोड्याचा कचरा निर्माण करणाऱ्यांनी खालील बाबींचे पालन करणे बंधनकारक आहे.

१. C & D WasteGenerate करणाऱ्या सर्वांनी शहरात इतरत्र कोठेही सदरचा राडारोडा न टाकता मनपाने उपलब्ध करुन दिलेल्या कॉल सेंटर टोल फ्रि क्रमांक १८००-१२० ३३२१२६ यावर संपर्क करुन राडारोड्याविषयी माहिती द्यावी. त्यानंतर सदरचा राडारोडा उचलणेची व्यवस्था करणेत येईल.
२. सदर बांधकाम राडारोड्यामध्ये कॉंक्रीट, माती, स्टील, लाकुड, विटा आणि रेतीमिश्रीत सिमेंट या बांधकाम साहित्याशिवाय इतर कचरा मिक्स करु नये. सदरचा कचरा गोळा करुन त्याची वाहतुक करणेस मनपाचे नियुक्त कंपनीस सांगू शकता किंवा स्वताचे वाहनाने मोशी येथील प्लॅन्टवर आणुन टाकू शकता.
३. शहरातील खाजगी, शासकीय, निमशासकीय ठेकेदाराकडून [Bulk Generator] निर्माण होणाऱ्या बांधकाम राडारोड्याचे अंदाजे प्रमाण व ठिकाण मनपाकडे नोंदणी केलेनंतर आवश्यक क्षमतेच्या कंटेनरची सोय करणेत येईल.
४. यापुढे शहरातील सर्व खाजगी, शासकीय, निमशासकीय कंत्राटदाराने बांधकाम चालु करणेपूर्वी मनपाची किंवा इतर सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेताना मनपाकडे C & D Waste साठी Registration करुन राडारोड्याच्या प्रमाणात निश्चित केलेल्या दरानुसार २५% आगाऊ रक्कम मनपाकडे जमा करावी लागेल.
५. मनपा परिसरात बांधकाम राडारोडा निर्मितीदाराकडून वाहतुकीसाठी व त्यावर प्रक्रिया करणेसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारणेत येईल.

बांधकाम राडारोडा उचलणे व मोशी राडारोडा प्रक्रिया केंद्रापर्यंत वहन खर्च	र.रु. १५/- प्रति किमी/प्रतिटन
बांधकाम राडारोडा प्रक्रिया शुल्क.	र.रु. २५०/- प्रतिटन

नियमबाह्य राडारोडा व्यवस्थापनाकरिता दंड

६. पिंपरी चिंचवड शहरामध्ये निर्माण होणाऱ्या राडारोड्याच्या संबंधी मनपाच्या यंत्रणाशी संपर्क न करता अनाधिकृतपणे कोणीही सदरचा राडारोडा नैसर्गिक नदी, नाले, ओढे, तळे इत्यादी जलस्त्रोताच्या बाजूने किंवा रस्ता, पदपथ किंवा मोकळ्या खाजगी, शासकीय जागेवर टाकलेचे आढळल्यास संबंधितांवर राडारोड्याच्या प्रमाणात वाहतुकीसाठी व प्रक्रियेसाठी येणाऱ्या खर्चाच्या १० पट रक्कम दंड म्हणून वसूल करणेत येईल. तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा मनपाच्या वतीने दाखल करणेत येईल.

राडारोड्यापासून पुर्ननिर्मिती घटकांच्या वापरास प्रोत्साहन

७. जमा होणाऱ्या राडारोड्यावर प्रक्रिया करुन निर्माण झालेले बांधकाम साहित्य मनपासाठी व शहरातील खाजगी, शासकीय बांधकाम व्यवसायिकांना बाजारभावापेक्षा २०% कमी दराने उपलब्ध करुन दिले जाईल.
८. मनपाच्या विकास कामामध्ये बांधकाम राडारोड्यापासून निर्माण झालेल्या बांधकाम साहित्याचा [Non Structural Member उदा. GSB, Wet Mix, पेव्हर ब्लॉक, कर्ब स्टोन, चेंबर कव्हर, दगड, वाळू, विटा, इत्यादी] चा वापर कमीत कमी २०% करणे बंधनकारक राहील.

उपरोक्तप्रमाणा जाहीर सुचना प्रसिध्द झालेपासून शहरात निर्माण होणाऱ्या बांधकाम राडारोडा व्यवस्थापन नियम २०१६ [Construction & Demolition Waste Management Rules 2016] अंतर्गत मा.महापालिका सभेने मंजूर केलेले धोरणाची अंमलबजावणी शहरातील सर्व निर्मितीदारांवर बंधनकारककरणेत येत असून याबाबतची विस्तृत नियमावली मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. [www.pcmcindia.gov.in]

सही/-
(श्रावण हर्डीकर), आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - १४३
जावक क्रमांक - पत्रक/१/कावि/१७७/२०१९
दिनांक - ०२/१२/२०१९

जाहिरात क्र. १/८६७ दि. ३/१२/१९

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ४११००५,
महाराष्ट्र
जाहीर सूचना
(घनकचरा व्यवस्थापन, दंड आकारणी बाबत)

या जाहीर सूचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एस.ओ. १३५७ (इ) दिनांक. ०८/०४/२०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालु आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड करण्याचे (Spot Fine) अधिकार नगरपरिषदा/ नगर पंचायतींना शासन निर्णय क्र. असाधारण क्र. ४५५, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. १९ डिसेंबर २०१८ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

त्यास अनुसरून या पुणे महानगरपालिकाच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/ संस्थांकडून खालील प्रमाणे दंडनीय रक्कम वसूल करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, डिसेंबर १९, २०१८/अग्रहायण २८, शके १९४० भाग ब (शास्तीची अनुसूची)

कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी शास्ती (रूपयांमध्ये)

क्रमांक	विलगीकरण, साठवणूक, वितरण व संकलन याबाबतचे उल्लंघन	अ व ब वर्ग	अ व ब वर्ग
(१)	(२)	(३)	(४)
१	विलगीकरण न केलेला व वेगळ्या डब्यांमध्ये साठवण न केलेला कचरा सोपविल्याबद्दल :		
२	अ) व्यक्ती		
	पहिला प्रसंग	६०	५०
	दुसरा प्रसंग	१२०	१००
	तिसरा प्रसंग	१८०	१५०
	नंतरच्या प्रत्येक प्रसंगी	१८०	१५०
३	ब) मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक		
	पहिला प्रसंग	५०००	३०००
	दुसरा प्रसंग	१००००	६०००
	तिसरा प्रसंग	१५०००	९०००
	नंतरच्या प्रत्येक प्रसंगी	१५०००	९०००
४	कचरा जाळण्याबद्दल	५०० ३००	
	विशिष्ट वर्गवारी/परिस्थिती		
५	सार्वजनिक सभा/समारंभ संपल्यावर चार तासांच्या आत स्वच्छता न केल्याबद्दल	स्वच्छता अनामत रक्कम जप्त करणे.	

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घेवून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करावे.

जावक क्र. :
दिनांक :
ठिकाण :

SEAL

स्वाक्षरी/-
(सौरभ राव)
आयुक्त, पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ४११००५,
महाराष्ट्र
जाहीर सूचना
(घनकचरा व्यवस्थापन, दंड आकारणी बाबत)

या जाहीर सूचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एस.ओ.१३५७ (इ) दिनांक. ०८/०४/२०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालु आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड करण्याचे (Spot Fine) अधिकार नगरपरिषदा/नगरपंचायतींना शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१७/प्र.क्र. २५६(१)/नवि-३४, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. ०७ सप्टेंबर, २०१८ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत. तसेच मा. मुख्य सभा ठ.क्र. ८१२ दि. २१/१२/२०१६ अन्वये कचरा उघड्यावर टाकणे/ साठवणे/यासाठी दंडाची तरतूद करण्यात आली आहे. सर्व व्यावसायिक आस्थापना, दुकाने यांच्या आवारात कचरा आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील.

त्यास अनुसरून या पुणे महानगरपालिकाच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/ संस्थांकडून खालील प्रमाणे दंडनीय रक्कम वसूल करण्यात येत आहे.

(दंडाचे जोडपत्र)

उपविधी	अपराध / गुन्हे	प्रथम प्रसंग	दुसरा प्रसंग	तिसरा प्रसंग
कचरा उघड्यावर टाकणे/ साठवणे/ शून्य कचरा प्रणाली नियमांविरूध्द कचऱ्याची विल्हेवाट लावणे	घरगुती / निवासी मिळकती.	५००	७५०	१०००
	बिगरनिवासी मिळकती व संस्था	१०००	१५००	२०००
	कारखाने/उद्योग	२०००	३०००	४०००

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घेवून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करावे.

जावक क्र. :
दिनांक :
ठिकाण :

SEAL

स्वाक्षरी/-
(सौरभ राव)
आयुक्त
पुणे महानगरपालिका